MHKO180007532022

**<u>संक्षिप्त फौजदारी खटला क्र.२६८/२०२२</u>**

नि. ६/ सी लगत.

महाराष्ट्र सरकार वि. आनंदा गोपाळ माळी वगैरे १

## <u>न्या य नि र्ण य</u>

( घोषित दिनांक : १९ एप्रिल, २०२३ )

आरोपींची प्रस्तुत खटल्याव्दारे मुंबई जुगार प्रतिबंध कायदा कलम १२(अ) नुसार संपरीक्षा घेण्यात आली. आरोपीविरुध्द फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ३१३ अन्वये जबाब नि.क्र.८ वर नोंदविण्यात आला व त्याचा बचाव पुर्णपणे नकारात्मक आहे.

२. अभियोग पक्षातर्फे सहा.सरकारी अभियोक्ता सौ.वर्षा पाराज–पाटील व आरोपी तर्फे वकील सौ.एस.पी.पाटील यांचा युक्तीवाद ऐकला. सादर पुराव्यावरुन खालील मुद्दे माझे विचारार्थ घेतले व त्यावरील माझे निष्कर्ष पुढील कारणमीमांसेद्वारे देत आहे:–

| <u>अ.क्र.</u> | <u>मुद्दे</u> | <u>निष्कर्ष</u> |
|---|---|---|
| १. | अभियोग पक्षाने हे सिध्द केले आहे काय की, दि.३०/०८/२०२२ रोजी १३.३० वाजणेचे सुमारास कुरुंदवाड गावचे हद्ददीत चैतन्य क्लीनिक लॅबोरेटरीजवळ, जैन बस्ती येथे आरोपी हे स्वतःचे फायदयाकरीता लोकांचेकडून पैसे घेवून व त्यांना कल्याण मटक्याच्या चिठ्ठया देवून मुंबई मटका नांवाचा जुगार खेळत असताना मिळून आला ? | ...नाही. |
| २. | आदेश काय ? | आरोपींची निर्दोष मुक्तता करण्यात येते. |

## <u>कारणमीमांसा</u>

**<u>मुद्दा क्रमांक १ व २ करीता</u>** :-

३. अभियोग पक्षातर्फे श्री.राजेंद्र सुखदेव पवार यांचा पुरावा नोंदविला. त्यांनी कथन केले की, दि.३०/०८/२०२२ रोजी ते कुरुंदवाड पोलीस स्टेशनला ठाणे अंमलदार म्हणून नेमणुकीस असताना पो.कॉ.सुप्रिया काथरट, स्था. गु.अन्वेषण शाखा कोल्हापूर यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार आनंदा गोपाळ माळी चिखली विभाग, दत्त मंदीरजवळ कुरुंदवाड याठिकाणी दोन इसम कल्याण मटका जुगार स्वतःच्या फायदयासाठी खेळत असल्याचे मिळून आले. त्यावेळी त्यांनी छापा टाकून त्यांच्याकडून रोख रक्कम रु.४७५०/-, निळया रंगाचा बॉलपेन व एक आकडे लिहीलेली चिठ्ठी जप्त केली. फिर्यादीच्या सांगण्याप्रमाणे त्यांनी फिर्याद नोंदवून घेतली. तसेच मुद्देमाल पो.कारकून यांचेकडे जमा केला. आरोपीतर्फे घेण्यात आलेल्या उलटतपासामध्ये साक्षीदाराने आरोपीची सर्व कथने नाकारली.

४. या साक्षीदाराच्या पुराव्याचे अवलोकन करता घटनेचा प्रत्यक्षदर्शी साक्षीदार नसल्याचे साक्षीदाराने उलटतपासात मान्य केले. घटनास्थळ हे कुरुंदवाड गावचे हद्दीत चैतन्य क्लीनिक लॅबोरेटरीजवळ, जैन बस्ती येथे आहे. परंतु घटनास्थळाच्या आजुबाजुच्या एकाही स्वतंत्र साक्षीदाराचा जबाब नोंदविल्याचे अभिलेखावरुन दिसून येत नाही. केवळ पोलीस साक्षीदारांचेच जबाब नोंदविले आहेत. अशा परिस्थीतीमध्ये आरोपींचा घटनेतील सहभाग सिध्द करणेसाठी आवश्यक तो पुरावा अभिलेखावर नाही. त्यामुळे आरोपी जुगार खेळत असताना पकडले गेले व त्यांच्याकडून मुद्देमाल जप्त केली ही बाब या साक्षीदाराच्या कथनावरुन सिध्द होत नाही. फिर्याद नि.७ यास निशाणी देण्यात आली असली तरी देखील घटनेबाबत फिर्यादीने फिर्याद दाखल केली एवढीच बाब साक्षीदाराच्या पुराव्यावरुन शाबीत होते.

५.		तथाकथित घटनास्थळ पाहता त्या घटनास्थळावरील कोणाही स्वतंत्र साक्षीदाराचा प्रत्यक्ष पुरावा अभिलेखावर नाही. अशा साक्षीदाराचा जबाब देखील दोषारोपपत्रामध्ये नाही. केवळ पोलीस साक्षीदाराचे जबाब नोंदविल्याचे दिसून येते. त्यामुळे कोणत्याही स्वतंत्र साक्षीदाराच्या विश्वासपात्र पुराव्याअभावी तथाकथित घटना घडली हे सिध्द होत नसल्याने मुद्दा क्र.१ याचा निष्कर्ष नकारार्थी नोंदविण्यात येतो व मुद्दा क्रमांक २ चे उत्तरादाखल खालीलप्रमाणे आदेश निर्गमित करण्यात येतो :-

**आदेश**

१. आरोपींची मुंबई जुगार प्रतिबंध अधिनियम १८८८ चे कलम १२-अ अन्वये दोषारोपातून फौजदारी प्रक्रिया संहितेचे कलम २५५ (१) नुसार निर्दोष मुक्तता करण्यात येते.

२. आरोपीचे वैयक्तिक व जमानतदाराचे बंधपत्र रद्द करण्यात येते.

३. प्रकरणातील जप्त मुद्देमाल रोख रक्कम रुपये ४७५०/- अपील कालावधीनंतर सरकारजमा करण्यात यावीत.

४. जप्त मुद्देमाल कल्याण मटका आकडे लिहिलेल्या चिठ्ठया व एक बॉलपेन असल्याने अपीलाचा कालावधी पूर्ण झाल्यानंतर नाश करण्यात यावा.

५. आरोपींनी फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ४३७-अ प्रमाणे प्रत्येकी रक्कम ₹१५,०००/- चे जामीन पत्र व बंधपत्र देणेचे आहे. सदर जामीन सहा महिन्याचे कालावधीनंतर रद्द समजणेत यावा.

(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात घोषित केला.)

Digitally signed by Atul Arun Kulkarni
Date: 2023.04.29 11:11:14 +0530

दिनांक - १९ एप्रिल, २०२३		(अ.अ.कुलकर्णी)

प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, कुरुंदवाड